## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- १२४/२०२०/जळगांव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| प्रा.डॉ. महेंद्रकुमार सुपडू पगारे<br>रा. संचालक व विभागप्रमुख,<br>मराठी विभाग भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र, जळगांव, जि. जळगांव | उप कुल सचिव,<br>प्रशासन विभाग,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव,<br>ता.जि. जळगांव |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

0 6 MAR 2024

**सुनावणी दिनांक १४/१२/२०२३**

तक्रारदार यांनी दिनांक १८/०२/२०२० रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १४/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित असुन तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १८/०२/२०२० रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार काही माहिती अपुर्ण दिली आहे.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २६८८/२०१८/जळगांव संदर्भात दिनांक ०९/१२/२०१९ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. “विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१/०६/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.”

४) सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपिल क्र २६८८/२०१८/जळगांव संदर्भात दि. ०९/१२/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार तक्रारदारास दि. ०३/०२/२०२० च्या पत्रान्वये एकुण ३१ पानांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तक्रारदार प्रा. डॉ. महेंद्रकुमार सुपडू पगारे यांनी ७ अपिलांबाबत एकच तक्रार केली आहे.

आजच्या सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित असल्यामुळे कोणती माहिती मिळाली व कोणती माहिती अपूर्ण मिळाली याचा कोणताही बोध होऊ शकले नाही. त्यामुळे तक्रारदाराची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक १२४/२०२०/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)

राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जा.क्रं. आ. ३ey

0 6 MAR 2024